“सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हंटल तर तो उद्या कधीच येत नाही”.

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२५ फेब्रुवारी २०२५


## थोडक्यात

### होळीच्या तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**दि.२४, मुंबई :** गेल्या अनेक कालावधीपासून एसटी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्या प्रलंबित आहेत. त्यांची पूर्तता होण्यासाठी एसटी महामंडळातील सर्व कामगार, कर्मचारी ५ मार्च रोजी सर्व आगार, विभागाच्या मुख्यद्वारावर आंदोलन करणार आहेत. या निदर्शने आंदोलनाची दखल एसटी महामंडळ, राज्य सरकारने न घेतल्यास, त्यानंतर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेकडून दिला आहे. परिणामी, एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलनाचा मोठे स्वरूप प्राप्त झाल्यास होळीच्या कालावधीत वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

राज्य परिवहन (एसटी) महामंडळाकडे प्रलंबित असलेली विविध स्वरूपाची थकबाकी एसटी कामगारांना देण्याबाबत वारंवार मागणी करूनही ती मिळत नसल्यामुळे कामगारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. ती दूर करण्यासाठी व कामगारांना देय असलेल्या वाढीव वेतनाच्या थकबाकीमध्ये खंड पडू नये यासाठी १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२४ या कालावधीची देय होणारी थकबाकी त्वरीत देण्यात यावी. तसेच २०१८ सालापासूनची महागाई भत्याची थकबाकी कामगारांना अदा करण्याचा निर्णय न्यायालयाने दिला आहे. ही थकबाकी अद्याप कामगारांना मिळालेली नाही. तसेच घरभाडे भत्याचा दर, वेतनवाढीचा दर कमी करण्यात आला आहे. एसटी कामगारांना वाढीव ५० टक्के महागाई भत्ता लागू करण्याबाबत वारंवार मागणी करूनही सुमारे १ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असतानाही ५० टक्के महागाई भत्ता कामगारांना लागू केलेला नाही. हा महागाई भत्ता थकबाकीसह कामगारांना मार्च २०२५ च्या वेतनापासून लागू करण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

### सीआरपीएफ जवानाची गोळी झाडून आत्महत्या

**दि.२४, गडचिरोली :** जिल्ह्यातील धानोरा येथील केंद्रीय राखीव दलाच्या (सीआरपीएफ) जवानाने २४ फेब्रुवारीला सकाळी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. गिरीराज रामनरेश किशोर (३०) असे मृत जवानाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गिरीराज किशोर हे मूळचे उत्तरप्रदेश राज्यातील आग्रा येथील मूळ रहिवासी असून केंद्रीय राखीव दलाच्या ११३ बटालियनमध्ये कार्यरत होते.ऑक्टोबर २०२४ पासून ते धानोरा येथील पोलिस ठाण्यात कर्तव्यावर होते. त्यांनी आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. धानोरा पोलिसांनी या घटनेची माहिती त्यांच्या कुटुंबीयांना कळविली असून उत्तरीय तपासणी बाकी आहे.

तीन दिवसांपूर्वीच परतले होते सुटीवरुन

तीन दिवसांपूर्वीच ते सुटीवरुन कर्तव्यावर परतले होते. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास त्यांनी स्वत:कडील रायफलमधून कानशिलात गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेनंतर पोलिसांनी त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांनी आत्महत्या केली की चुकून गोळी लागली, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

## हिंमत असेल तर नीलम गोऱ्हेंनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल करावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. तीन दिवस झालेल्या या संमेलनाला महाराष्ट्रासह दिल्लीत राहणाऱ्या मराठी माणसांनी मोठा प्रतिसाद दिला. पण या साहित्य संमेलनात बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर एक गंभीर आरोप केला. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या दिल्या की एक पद मिळतं, असं विधान नीलम गोऱ्हे यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर केलं. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली.

यावरून खासदार संजय राऊत यांनी देखील जोरदार टीका केली. एवढंच नाही तर शरद पवार यांनी



देखील प्रतिक्रिया देत नीलम गोऱ्हे यांचं विधान चुकीचं असल्याचं म्हटलं. दरम्यान, यानंतर आता प्रहार संघटनेचे नेते तथा माजी आमदार बच्चू कडू यांनीही या वादात उडी घेतली. हिंमत असेल तर नीलम गोऱ्हेंनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल करावा, असं बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

**बच्चू कडू काय म्हणाले?**

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी जर उद्धव ठाकरे यांना मर्सिडीज गाड्या दिल्या असतील तर कोणत्या क्रमांकाच्या दिल्या ते त्यांनी सांगितलं पाहिजे. खरं तर नीलम गोऱ्हे यांच्याकडून आम्हाला या अपेक्षा नाहीत. त्या उद्धव ठाकरे यांच्याबाबत बोलल्या म्हणून मी बोलत नाही. मात्र, कोणत्याही नेत्यांना कोणत्याही नेत्यांच्या विरोधात बोलायचं असेल तर काही संदर्भ किंवा काही पुरावे दिले पाहिजेत. पण कोणतेही पुरावे न देता आपण बोलत असू तर ते योग्य नाही, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे.

तसेच जर नीलम गोऱ्हे यांनी जर उद्धव ठाकरे यांना गाडी दिली असेल तर कोणती गाडी दिली ते सांगावं. गुन्हे दाखल करावेत. नीलम गोऱ्हे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी उद्धव ठाकरेंवर गुन्हा दाखल केला पाहिजे. नीलम गोऱ्हे या उपसभापती आहेत. त्यांनी असे बिनबुडाचे आरोप करू नयेत. मात्र, जर खरंच उद्धव ठाकरे यांनी गाड्या घेतल्या असतील तर नीलम गोऱ्हे यांनी रणरागिणी सारखं समोर आलं पाहिजे, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे.

**नीलम गोऱ्हे काय म्हणाल्या होत्या?**

कुठल्याही कार्यकर्त्याला कमी लेखण्याचं काही कारण नाही. २०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की संपर्क नको असेल नेत्यांना तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या दिल्या की एक पद मिळतं ही वस्तुस्थिती आहे. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचं सगळीकडे लक्ष होतं. नंतर अवनती होत गेली, असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या होत्या.

## महाराष्ट्रात चोरी, गुजरातेत आरोपी आणि दागिने मध्यप्रदेशात...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, बुलडाणा :** जिल्ह्यातील औद्योगिक नगरी म्हणून परिचित खामगाव मधील अजब चोरीचा असा गजब तपास लागला आहे. फारसे पुरावे आणि साक्षीदार नसताना बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेने ही कामगिरी बजावली आहे. थेट गुजरात राज्यातून दूरवरच्या बुलढाणा जिल्ह्यात येऊन अपराध करणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या एका पथकाला यश मिळाले आहे. या कामगिरीचे कौतुक होत आहे. आरोपीला गुजरात राज्यातील उधना (जिल्हा सुरत ) येथून जेरबंद करण्यात आले आहे.

त्याच्याकडून मध्यप्रदेश मध्ये सुरक्षित ठिकाणी ठेवलेले साडेचार लाख रुपयांचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे. फारसे पुरावे नसताना बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. आरोपीला अटक करुन बुलढाणा येथे आणण्यात आले असून त्याचा जिल्ह्यातील अन्य चोरी वा घरफोडीच्या घटनेत सहभाग आहे का? याची कसून चौकशी व तपास करण्यात येत आहे. गेल्या काळात खामगाव व शेगावमध्ये झालेल्या घरफोडी, जबरी चोरीच्या गुन्ह्यांची पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी गंभीर दखल घेतली. खामगाव येथील धाडसी घरफोडीच्या घटनेत लाखो रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने लंपास करण्यात आले होते. या घरफोडीचा तपास खामगाव पोलिसासाठी एक कडवे आव्हान ठरले होते. या गुन्ह्यांचा सखोल तपास व गुन्ह्याची उकल करत आरोपीचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, यांनी बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते.

शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांनी त्यांच्या अधिनस्थ पोलीस अधिकारी व अंमलदारांची स्वतंत्र पथके तयार केली.त्यांना जिल्ह्यातील जबरी चोरी, घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास करण्याच्या सुचना दिल्या



होत्या. खामगाव पोलिसांच्या अभिलेखावर दाखल असलेला पवन बाळकृष्ण अहीर (रा. सावजी ले-आऊट, खामगाव) यांच्या घरफोडीचा गुन्हा तपासावर घेतला. गोपनीय खबरे व तांत्रिक माहिती काढली असता, गुन्ह्यामध्ये उधना (जि. सुरत) येथील अट्टल चोरटा तेजपालसिंग निहालसिंग भाटिया (वय ३३ वर्षे) याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

पोलीस अधीक्षक पानसरे यांनी आंतरराज्यीय तपासाचे सर्व सोपास्कार पार पाडले. स्थागुशाचे अशोक लांडे, खामगाव शहरचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण पवार यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक यशोदा कणसे, पोलीस अंमलदार एजाज खान, दिगंबर कपाटे, अजीज परसुवाले, पोलीस अंमलदार शिवानंद हेलगे यांच्यासह खामगाव शहरचे पोलीस उप निरीक्षक राजेश गोमासे, अंमलदार सागर भगत, निशांतकुमार, तांत्रिक विश्लेषक कैलास ठोंबरे, ऋषीकेश खंडेराव यांनी गुजरातस्थित उधना (जिल्हा सुरत) गाठले. त्या ठिकाणी सापळा लावून आरोपी तेजपालसिंग भाटीया याला बेड्या ठोकल्या.


सुरुवातीला उडवाउडवीचे उत्तरे देणाऱ्या तेजपालसिंगला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली, तसेच उपरोक्त घरफोडीत लंपास केलेले ६० ग्रॅम सोने (किंमत ४ लाख ५० हजार रुपये), १०० ग्रॅम चांदी (किंमत ८ हजार रुपये), असा एकुण ४ लाख ५८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल मध्यप्रदेशातील बलवानी (जिल्हा बडवानी) येथून पथकाच्या स्वाधीन केला. त्यामुळे उपरोक्त गुन्हा उघडकीस आला.

## कुंडलवाडी शहरातून चिऊताई भूर्र...

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२४, कुंडलवाडी :** चिऊताई येदाणा खापाणी पी भूर्र दिशी उडून जाहे बालगीत आता कुंडलवाडी भागात हरवले आहे. चिमण्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न बदलत्या काळानुरूप निर्माण झाला आहे. साधारण २५ ते ३०वर्षांपूर्वी प्रत्येकाचे बालपण 'एक घास चिऊचा'ने भरलेले होते. ती चिऊताई अर्थात चिमणी आज दुर्मिळ झाली असून, आजच्या पिढीला चित्रात दाखवण्याची वेळ आली आहे. माणसाच्या आधुनिक जीवनशैलीमुळे आणि वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेले शहरातील सिमेंट क्राँक्रीटच्या मोठ्या भिंती फक्त सूर्यप्रकाश येण्यासाठी असणारी काचे, प्रचंड वृक्षांची तोड, वाढते ध्वनी - वायू प्रदूषण, फ्लॅट संस्कृतीतील बंद खिडक्या दारांमुळे चिऊताईंच्या घरट्यांना जागाच मिळत नसल्याने शहरातून चिऊताई भूर्र झाली आहे.पण मात्र गावात अजूनही मोकळ्या जागेत आणि चिऊताईना दाणा-पाण्यांची सोय होत असल्याने चिऊताईचे अस्तित्व अबाधित असल्याचे दिसत आहे.

तसेच मोबाईल टॉवर्समधील



विद्युत - चुंबकीय लहरीमुळे चिमण्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. चिमण्यांच्या अस्तित्वाला कुठलाच धोका आहे का नाही, हा एक संशोधनाचा विषय आहेच. गेल्या १५-२० वर्षात संख्या खूप कमी झाली. पर्यावरणातील जैववैविध्य साखळीत प्रत्येक सजीवाप्रमाणे चिमणीचेही महत्त्वाचे स्थान आहे. ती नष्ट झाली तर, जैववैविध्य साखळीवरही दुष्परिणाम होईल.मात्र चिमणीचा अधिवास वाढविण्यासाठी संयुक्त प्रयत्नांची गरज आहे. अशा परिस्थितीत जनजागृतीसोबतचं सरकारने चिमण्यांच्या घटत्या संख्येची गांभीर्याने दखल घेऊन उपायोजना करणे गरजेचे आहे.

शहरातून चिमणीचे वास्तव कमी होण्याची कारणं पूर्वी चिमण्या हम खास घराच्या बाहेर किंवा अगदी घरातही एखाद्या फोटो मागे किंवा खिडक्यांच्या वर घरटे करायच्या. आता मात्र शहरात घरांची दारे आणि खिडक्या तशा बंदच असतात. तसेच घराबाहेर धान्य वाळत घालणे, अन्न पदार्थ निवडणे, पाखडणे या क्रिया होत, त्यातले दाणे चिमण्या टिपत, पण आता शहरात बहुतांश या प्रक्रिया घरातच होतात, तिथं चिमण्यांना शिरकावाला जागा नसते, या शहरातील आता अंगणेही हरवली आहेत, त्यामुळे चिमण्याला घराबाहेर मिळणारे दाणा-पाणी हरवले आहे. तसेच चिमण्यांचे खाद्य असलेले किटक,अळ्या,व धान्य शहरात आता उपलब्ध होत नाही. तसेच घरटे करण्यासाठी जागा नाही, त्यांच्या अधिवासाच्या काही जागा कबुतरांनी बळकावल्यात त्यामुळे शहरांतून चिमण्या हद्दपार होत आहेत. चिमण्यांची संख्या वाढवण्यासाठी पक्षी अभ्यासकांनी तसेच पक्षी प्रेमी नागरिकांनी यावर अभ्यास करून उपाययोजना करावेत व एक सामूहिक चळवळ पक्षी संवर्धनासाठी उभी करावी.

## आयुक्तांच्या इशाऱ्यानंतर गजा मारणे पोलीस ठाण्यात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, पुणे :** कोथरूड भागात संगणक अभियंत्याला बेदम मारहाण प्रकरणात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर गुंड गजानन उर्फ गजा मारणे हा सोमवारी सायंकाळी कोथरूड पोलीस ठाण्यात हजर झाला. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मारणे टोळीविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा दिल्यानंतर सोमवारी मारणे हा आईसोबत पोलीस ठाण्यात हजर झाला.

संगणक अभियंता देवेंद्र जोग यांना कोथरूड भागात शिवजयंतीच्या दिवशी मारणे टोळीतील गुंडांनी मारहाण केली. या प्रकरणी गजा मारणे, रूपेश मारणेसह सहा जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. या प्रकरणात मारणेसह साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. या प्रकरणी मारणेचा भाचा श्रीकांत ऊर्फ बाब्या संभाजी पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईची चाहूल लागताच गजा मारणे, रूपेश मारणे, बाब्या पवार हे पसार झाले. कोथरूड पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकांकडून दोघांचा शोध घेण्यात येत होता. पोलिसांनी मारणेच्या वास्तव्याच्या ठिकाणी छापे टाकले. मुळशी तालुक्यात शोध घेण्यात आला. जवळपास ७४ ठिकाणी पोलिसांनी छापा टाकला.

**‘बस झाला चोर-पोलिसांचा खेळ’**

गजा मारणेचा शोध सुरू होता. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी ‘बस झाला चोर-पोलिसांचा खेळ, त्याला हजर होण्यास सांगा,’ असा इशारा दिला. त्यानंतर मारणे सोमवारी सायंकाळी कोथरूड पोलीस ठाण्यात हजर झाला. या प्रकरणी मारणेचा साथीदार रुपेश मारणे, बाब्या पवार हे पसार झाले असून, त्यांचा शोध घेण्यात येत असल्याचे परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले.

**नेमके काय घडले ?**

शिवजयंतीच्या दिवशी गजा मारणे आणि साथीदार कोथरूडमधील एका मल्टिप्लेक्समध्ये चित्रपट पाहण्यासाठी गेले होते. त्याचा गाड्यांचा ताफा भेलकेनगर चौकात आला. त्या वेळी शिवजयंतीनिमित्त मिरवणूक निघाली होती. दुचाकीस्वार संगणक अभियंता देवेंद्र जोग यांनी पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी झालेल्या वादातून मारणे टोळीतील गुंडांनी जोग यांना बेदम मारहाण केली. मारणेच्या ताफ्यातील वाहनांची माहिती घेण्यात येत आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. मारणेच्या ताफ्यातील दुचाकी आणि मोटारी जप्त करण्यात येणार आहेत, तसेच मारणेच्या मालमत्तेची माहिती घेण्यात येत आहे.

संपादकीय



## डॉलरचे वर्चस्व वाढते कसे?

डोनाल्ड ट्रम्प यांचा गेल्या नोव्हेंबरमधील अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजय निर्णायक आणि व्यापक होता. त्यांच्याकडे अर्थातच व्हाइट हाऊसवरील नियंत्रण आहेच पण आता त्यांच्या पक्षाचे दोन्ही प्रतिनिधीगृहांवर म्हणजेच कनिष्ठ सभागृह (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह्ज) आणि वरिष्ठ सभागृह (सेनेट) यांवर बहुमत आहे. याला 'गव्हर्निंग ट्रायफेक्टा' म्हणतात, त्यावर वर्चस्व असणे ही राष्ट्राध्यक्षांना आपली धोरणे विनासायास राबवण्यासाठी आदर्श स्थिती मानली जाते. दुसऱ्यांदा अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन आठवड्यांत त्यांनी जवळपास ६४ कार्यकारी आदेश जारी करून आपल्या वाढलेल्या प्रभावाचा उपयोग केला आहेच. २०१७ मध्ये सुरू झालेल्या त्यांच्या पहिल्या कार्यकाळाच्या तुलनेत, या वेळी त्यांना सर्वोच्च न्यायालयातही परंपरावादी आणि रिपब्लिकन पक्षाकडे झुकणाऱ्या न्यायाधीशांचे दोनतृतीयांश बहुमत अशी आणखी एक जमेची बाजू मिळालेली आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेत जन्म झाला असल्यास आपोआप नागरिकत्व मिळण्याची तरतूद (जन्मसिद्ध नागरिकत्व) समाप्त करण्याच्या ट्रम्प यांच्या वचनाची पूर्तता करताना हे न्यायालयीन पाठबळ महत्त्वाचे ठरू शकते. नागरिकत्वाच्या तरतुदींत फेरफार फक्त कार्यकारी आदेशाने करता येणार नाही, आणि त्यासाठी घटनादुरुस्तीची गरज भासू शकते, या दुरुस्तीलाही अमेरिकेच्या संघराज्यीय सर्वोच्च कोर्टात आव्हान दिले जाऊ शकते. तरीसुद्धा, ट्रम्प यांची लोकप्रियता आता निवडणुकीच्या वेळेपेक्षा जास्त आहे, आणि ती त्यांना मत न दिलेल्यांपैकी दहा टक्के लोकांमध्येही वाढली आहे. याचा अर्थ असा की, ज्यांनी त्यांना मतदान केले नाही, तेही आता त्यांच्या धोरणांचे समर्थन करत आहेत. या धोरणांमध्ये व्यापार भागीदारांविरुद्ध टॅरिफ कारवाई (आयातशुल्क वाढवणे), बेकायदा स्थलांतरित नागरिकांवर कठोर कारवाई, युक्रेन व इतर युद्धांमधून माघार, नाटो मित्रदेशांकडून अधिक आर्थिक योगदानाची मागणी आणि एकूण सरकारचाच आकार, व्याप व खर्च कमी करणे, यांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांना धमकीच दिली आहे की, अमेरिका 'जशास तसे' आयात शुल्क वाढवेल. याला प्रत्युत्तर म्हणून, भारताने तत्काळ अमेरिकन बर्बन व्हिस्कीवरील आयात शुल्क १५० टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. हार्ले डेव्हिडसन मोटरसायकलींवरील शुल्क यापूर्वीच कमी करण्यात आले होते. भारताची अमेरिकेशी व्यापारी तूट सुमारे ३० अब्ज डॉलरची आहे, आणि ट्रम्प यांना ती तूट कमी करायची आहे. एफ ३५ आणि इतर लढाऊ वाहने खरेदी करण्याचा विचार सुरू आहे, हेदेखील अमेरिकन भावना शमवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

मात्र राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या काही इच्छा परस्परविसंगत वाटतात. एका बाजूला, व्यापार तूट कमी करणे आणि डॉलरचे मूल्य कमी करणे, यातून अमेरिकन निर्यात आणि नोकऱ्या वाढवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. दुसऱ्या बाजूला, ते डॉलर मजबूत करून जागतिक वर्चस्व टिकवून ठेवू इच्छितात. त्यांनी भारतासह ब्रिक्स देशांना धमकी दिली आहे की, त्यांनी जर डॉलरशिवाय अन्य चलनात व्यापार करण्याचा विचार केला, तर १०० टक्के आयात शुल्क लावले जाईल. म्हणजे ट्रम्प यांना डॉलर व्यापारासाठी कमजोर हवा, पण भूराजकीय रणनीतीसाठी मजबूत डॉलर हवा- यात विरोधाभास आहे. तरीसुद्धा वास्तव असे आहे की, डॉलर निर्देशांक (डीएक्सवाय) गेल्या २५ वर्षांतील उच्चांकाच्या जवळ आहे. डॉलरच्या सामर्थ्याचे आणि वर्चस्वाचे खरे स्रोत काय आहेत? हे उच्चांक राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना लाभलेल्या राजकीय पाठिंब्यामुळे आणि लोकप्रियतेमुळे होताहेत का? किंवा गव्हर्निंग ट्रायफेक्टावर त्यांचे वर्चस्व आहे, याचा तो परिणाम आहे का? तसे नाही. 'मजबूत सरकार, म्हणून मजबूत चलन' असा कोणताही थेट संबंध जोडता येणार नाही. मुळात, ट्रम्प यांच्या वर्चस्वासाठी ट्रायफेक्टाही पुरेसे नाही कारण सेनेटमध्ये कायदा मंजूर करण्यासाठी ६० टक्के बहुमत आवश्यक आहे, ते ट्रम्प यांच्याकडे सध्या नाही. रिपब्लिकन पक्षातील काही जण ट्रम्प यांच्या काही धोरणांना विशेषत: सरकारकडून लाभांमध्ये कपात आणि सरकारचा आकार कमी करण्याच्या योजनांना संमिश्र प्रतिसाद देत असल्याचे गेल्या काही दिवसांत दिसलेले आहे.

# दिल्लीत पुन्हा महिला राज !!



अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्षाचा दणदणीत पराभव करून भाजपने तब्बल सत्तावीस वर्षानंतर दिल्लीत सत्ता स्थापन केली. दिल्लीत अभूतपूर्व विजय मिळवताच सर्वांना एकच प्रश्न पडला तो म्हणजे दिल्लीचे नवे मुख्यमंत्री कोण ? या प्रश्नांचे उत्तर मिळण्यास काही जवळपास तेरा दिवसांचा कालावधी लागला कारण या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. पंतप्रधान फ्रान्स आणि अमेरिकेचा दौरा आटोपून आल्यावर भाजपने दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा केली. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा करताना भाजप श्रेष्ठींनी पुन्हा एकदा धक्का तंत्राचा अवलंब करून सर्वांना अचंबित केले. भाजपने मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये धक्कातंत्र राबवून अनपेक्षित असे नवे चेहरे समोर आणून त्यांना खुर्चीवर बसवले त्याच धक्कातंत्राचा वापर करत भाजप श्रेष्ठींनी दिल्लीतही अनपेक्षित नवीन चेहरा समोर आणून त्यांना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले. तो नवा चेहरा म्हणजे दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री रेखा गुप्ता. वास्तविक निवडणुकीच्या आधी आणि नंतर ही रेखा गुप्ता या मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीत नव्हत्या. त्या मुख्यमंत्री बनतील असा अंदाज कोणालाच आला नव्हता. कारण मागील दोन विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. भाजप प्रवेश वर्मा यांना मुख्यमंत्री बनवतील असा कयास होता कारण प्रवेश वर्मा हे दिल्लीचे माजी मुख्यमंत्री दिवंगत साहबसिंग वर्मा चिरंजीव. ते माजी खासदार असून दिल्लीतील प्रभावशाली नेते आहेत शिवाय त्यांनी अरविंद केजरीवाल यांचा पराभव केल्याने ते जायंट किलर ठरेलत. ते ज्या जाट समाजाचे आहेत त्यांची संख्या दिल्लीत लक्षणीय आहे मात्र भाजप श्रेष्ठींच्या त्यातही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मनात रेखा गुप्ता यांचे नाव होते. रेखा गुप्ता यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा वाटा आहे. संघाची पहिली पसंती रेखा गुप्ता याच होत्या कारण रेखा गुप्ता या विद्यार्थी दशेपासून संघ परिवाराशी जुळलेल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. संघाने त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या दिल्या त्या त्यांनी जबाबदारीने पार पाडल्या. दुसरी महत्वाची गोष्ट त्या महिला आहेत. दिल्लीत मागील काही वर्षात काँग्रेस व आपने महिलांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली. काँग्रेसच्या शिला दीक्षित या जवळपास पंधरा वर्ष दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या. आपनेही केजरीवाल तुरुंगात गेल्यावर आतिशी या महीलेकडेच मुख्यमंत्रीपदाची सूत्रे सोपवली. इतकेच नाही तर भाजपनेही दिल्लीत सुषमा स्वराज यांच्याकडेच मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली होती. त्यामुळे भाजपने तीच परंपरा राखत रेखा गुप्ता यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ घातली. रेखा गुप्ता या वैश्य समाजाच्या आहेत. केजरीवाल हेही वैश्य समाजाचे आहेत. मागील पंधरा वर्षापासून दिल्लीतील वैश्य समाज केजरीवालांच्या पाठीशी उभा होता. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने केजरीवालांकडे गेलेला वैश्य समाज पुन्हा आपल्याकडे वळवला आहे. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करण्यामागे आणखी एक कारण आहे. भाजप हा आज देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. देशातील १३ राज्यात आणि एका केंद्रशासित प्रदेशात भाजपची सत्ता आहे मात्र कोठेही भाजपने महिलेला मुख्यमंत्री पदाची संधी दिली नाही. वसुंधरा राजे या भाजपच्या शेवटच्या महिला मुख्यमंत्री होत्या. २०१३ ते २०१८ या कालावधीत त्या राजस्थानच्या मुख्यमंत्री होत्या. २०१८ नंतर अनेक राज्यात भाजपची सत्ता आली मात्र कोणत्याही राज्यात भाजपने महिलेला मुख्यमंत्री बनवले नाही त्यामुळे भाजपवर विरोधी पक्षांकडून टीका होत होती. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने ती टीका खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. नाही म्हणायला याआधी भाजपने चार महिलांना मुख्यमंत्री पदाची संधी दिली आहे. स्वर्गीय सुषमा स्वराज यांना दिल्ली, उमा भारती यांना मध्यप्रदेश, वसुंधरा राजे यांना राजस्थान तर आनंदीबेन पटेल यांना गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी बसवले होते. आता रेखा गुप्ता या भाजपच्या पाचव्या मुख्यमंत्री बनल्या आहेत. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने एकप्रकारे दिल्लीत महिला राज आणले आहे. आता रेखा गुप्ता यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. निवडणूक काळात भाजपने दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. भाजपने दिल्लीत महिलांना प्रतीमाह ३५०० रुपये रोख देण्याचे आश्वासन दिले आहे. या आश्वासनाला भुलून दिल्लीतील महिलांनी भाजपला भरभरून मते दिली आहेत. आता महिलांना प्रतिमाह ३५०० रुपये देतानाच दिल्लीची तिजोरी रिकामी होणार नाही याचीही काळजी त्यांना घ्यावी लागेल कारण तिजोरी रिकामी झाली तर त्याचा परिणाम विकास कामांवर होतो त्यामुळे दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करीत विकास कामे करण्याची तारेवरची कसरत त्यांना करावी लागणार आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# सर्वांनी एकमेकांशी संपर्क ठेवला तर उर्वरित आयुष्य चांगले जाईल : कमलाकर क्षीरसागर

**दि.२३, कल्याण :** बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन कल्याण विभागाच्या वतीने पंडित वाडी मंगल कार्यालय, गांधी चौक, कल्याण (प.) येथे दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते दूपारी ३ दरम्यान दुसरे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. मुंबई महापालिकेच्या विविध खात्यातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते. सभासदांसाठी नाश्ता, चहा, कोकम सरबत व जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. कल्याण विभागाच्या वतीने गुणवंत पदाधिकारी व सभासदांना ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. हार्मोनियम व तबल्याच्या ठेक्यावर मधुर गायनाच्या साथीने ईशस्तवन व स्वागत गीताचे दमदार सादरीकरण करण्यात आले. निवडक पुरुष व महिलांनी महाराष्ट्र गीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच योगेश जोशी यांच्या हसु आणि आसू हा एकपात्री कार्यक्रमाने उपस्थित सभासदांचे चांगले मनोरंजन झाले.

कार्यक्रमाला पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष कमलाकर क्षीरसागर, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे, संयुक्त कार्यवाह प्रतिभा पवार तसेच विद्या ठाकूर, अतुल राव व विनायक मोघे हे उपस्थित



होते. संस्थेचे अध्यक्ष कमलाकर क्षीरसागर यांनी सांगितले की, सध्या संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु आहे. मागील वर्षी मार्च महिन्यात २२५०० कर्मचाऱ्यांचा पेन्शनचा मोठा प्रश्न उभा राहिला होता. आधार कार्ड व पॅनकार्ड लिंक नसल्यामुळे ही समस्या उद्भवली होती. आपल्या असोसिएशनने ती समस्या सोडवण्यासाठी सभासदांना उत्तम सहकार्य केले. क्यु आर कोड ओळखपत्र कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी प्रशासनाला सहकार्य केले. या वर्षी जीवन प्रमाणपत्र प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर जर कोणाला मुंबई महापालिकेकडून ईमेल आला नसेल तर ताबडतोब पेन्शन विभागाशी संपर्क साधण्यासाठी आवाहन केले. केंद्र सरकारने जरी आयकर टप्पे १२ लाखांच्या पुढे नेले असले तरी इन्कम टॅक्स रिटर्न करणे गरजेचे आहे असे सांगितले. ज्या सभासदांनी आजतागायत आपली सर्व्हिस रेकॉर्ड किंवा पेन्शन क्लेमची कागदपत्रे ताब्यात घेतली नसेल त्यांनी ताबडतोब आपल्या आस्थापना विभागाशी संपर्क साधून ती ताब्यात घ्यावीत.

## नंबर प्लेट..

नव्या नंबर प्लेटची
खुशाल करा सक्ती
सरकारीतिजोरीची
कमाईतचंआसक्ती

पकडापकडी करा
गुन्हेगार हर व्यक्ती
दंड जबरीवसुलीत
खर्च पोलिस शक्ती

गुन्हेनोंदणी कराया
बेकारा करेनियुक्ती
सवड मिळेल तेंव्हा
बीलेकरावी चुकती

बरोब्बर पकडतात
नस दुखरी दुखती
सामान्यांना सतावा
काढा झकासयुक्ती

कंगाल होत शेवटी
नागरिकां द्या मुक्ती
सगळे नियम पाळू
अगाध ग्राहकभक्ती

सहन शीलता गच्च
ओसंडू वाहते रक्ती
जीएस्टी आकारणी
करणार बीलावरती

हे नियम सफल हो
येणारनवीनआवृत्ती
खिशा लावा गळती
चालू राहे अनुवृत्ती

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# सागरी सुरक्षेसोबतच मत्स्योत्पादन वाढीसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर महत्वाचा : मंत्री नितेश राणे

**दि.२४, मुंबई :** सध्याचा काळ हा एआय तंत्रज्ञानाचा काळ आहे. सागरी सुरक्षा बळकट करणे आणि मत्स्योत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर महत्वाचा असल्याचे प्रतिपादन मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी केले. मंत्रालयात आज सागर किनाऱ्यांवर होणारी घुसखोरी रोखणे आणि सागरी सुरक्षा बळकट करणे, तसेच सागरी आणि गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनात वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर या विषयी मंत्री श्री. राणे यांनी देशभरातील एआय तंत्रज्ञानाविषयी काम करणाऱ्या विद्यार्थ्यांशी आज संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.



चर्चेच्या सुरवातील मत्स्य व्यवसाय व बंदरे विभागाची एआय तंत्रज्ञानाबाबतची गरज व्यक्त करुन मंत्री श्री. राणे म्हणाले की, मत्स्योत्पादनात वाढ आणि सागरी सुरक्षा ही विभागाची प्राथमिकता आहे. सागरी मासेमारी आणि गोड्या पाण्यातील मासेमारी असे दोन वेगवेगळे भाग आहेत. या दोन्ही क्षेत्रामध्ये उत्पादन वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कशा प्रकारे नियोजन करता येईल. राज्याला ७२० किलोमीटर लांबीचा सागर किनारा लाभला आहे. या सागर किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी सध्या ड्रोनचा वापर केला जात आहे. त्यातून जमा झालेल्या माहितीचा वापर करून सागरी सुरक्षा आणखी बळकट करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे करता येईल याविषयी विद्यार्थ्यांनी विचार करावा.

तसेच विभाग स्वयंपूर्ण करणे, विभागाचा महसूल वाढवणे, मत्स्य व्यवसायातील, बंदरांच्या विकासातील अडचणी सोडवणे, अंमबजावणीमध्ये असलेल्या काही त्रुटींची पुर्तता करणे, विभागाचा संपूर्ण कारभार पारदर्शक करणे यासह अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढवून विभागाचे कामकाज आणखी प्रभावीपणे करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करणे याविषयीही सविस्तर सादरीकरण विद्यार्थ्यांनी तयार करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पारंपरीक मच्छिमार आणि पर्ससिन मच्छिमार असा एक फरक असला तरी राज्यातील किनारपट्टीच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये मासेमारीच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. त्यामुळे एकाच पद्धतीची योजना किंवा व्यवस्था सर्वच जिल्ह्यांमध्ये लागू करणे व्यवहार्य ठरणार नाही. तर प्रत्येक जिल्ह्याची वेगवेगळी गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे एआय तंत्रज्ञानाची प्रणाली विकसीत करण्यात यावी असेही मंत्री राणे म्हणाले.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी सुरक्षा आणि उत्पादन वाढीसाठी एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करावयाच्या उपायांविषयी नवनवीन संकल्पना सुचविल्या. त्यामध्ये मच्छिमारांसाठी मुख पडताळणी (फेस रेक्गनिशन) प्रणाली तयार करणे, किनारा मॅपिंग करणे, जीपीएस फेन्सिंग लावणे, तलावांचे मॅपिंग करणे, राज्यातील एखाद्या जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर एआय तंत्रज्ञान अधारित विकास प्रकल्प राबवण्यात यावा आणि त्यातून होणारे फायद्यांचे एक रोल मॉडेल तयार करून संपूर्ण राज्यात त्याप्रमाणे योजना राबवावी, सागरी सुरक्षेविषयी एक स्वंतंत्र एआयचे मॉडेल तयार करावे, मॅपिंगच्या माध्यमातून मासेमारी क्षेत्राची माहिती देणारे मॉडेल तयार करणे, मासेमारीसह हवामान आणि योग्य परिस्थितीचा अंदाज वर्तवणारे एआय अधारित मॉडेल तयार करणे अशा संकल्पना विद्यार्थ्यांनी यावेळी मांडल्या. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या संकल्पनांच्या दृष्टीने जीवायएएन यांनी एक परिपूर्ण सादरीकरण तयार करावे. या संकल्पनांच्या माध्यमातून सागरी सुरक्षा बळकटीकरण आणि मत्स्योत्पादन वाढ यासाठी कसा वापर करता येईल याचा प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करावा. आपण तयार करत असलेले हे मॉडेल देशासाठी मार्गदर्शक ठरणारे असेल. तसेच राज्याला मासेमारी क्षेत्रात अग्रेसर ठेवण्यासाठीही याचा उपयोग होणार असल्याचे मंत्री राणे म्हणाले.

यावेळी जीवायएएन चे योगेश राव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. तर डॉ. उमेश राऊत, नकुल प्यासी यांच्यासह देशभरातील विविध शहरातील विद्यार्थी दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई उपनगर (मुले) संघाची निवड

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२४, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने होणाऱ्या ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई उपनगर संघाची निवड करण्यात आली आहे. मुंबई उपनगर पूर्व विभाग किशोर गटाच्या कर्णधारपदी वंश कदम, पश्चिम विभाग किशोर गटाच्या कर्णधारपदी कृष्णा कनोजिया यांची निवड करण्यात आली आहे. मनमाड, नाशिक येथील गुरु गोविंदसिंह हायस्कूल शेजारील हॅलीपॅड मैदानावर दिनांक २५ फेब्रु. पासून या स्पर्धेला प्रारंभ होईल. मॅटच्या ४ क्रीडांगणावर सकाळ व सायंकाळ अशा दोन्ही सत्रात हे सामने खेळविले जातील.

मुंबई उपनगर (किशोर गट) पूर्व विभाग – वंश कदम (कर्णधार), आदित्य गुडेकर, आर्यन भोजने, सदामादित्य तायडे, तेजस शिरसागर, सागर धादवड, हर्षित गुप्ता,साहिल यादव, उध्दव महानोर, आर्यन वाघमारे, सन्नी शिर्के, साई खोपकर, प्रशिक्षक संजय जाधव, संघ व्यवस्थापक संदिप चव्हाण.

मुंबई उपनगर (किशोर गट) पश्चिम विभाग – कृष्णा कनोजिया, स्वरूप बाईत, प्रसाद तांबे, विजयनाथ पाल, वचन शिर्के, आर्यन जंगम, सुजित यादव, प्रणव वेले,अमन सिंग, आविष्कार पाटील, नैतिक बामनिया, निलेश गौड, संघ प्रशिक्षक हरीश आहेर, संघ व्यवस्थापक अमित लांबे.

## डोंबिवली मानपाडा रोडवर रस्ता सुरक्षेवर आधारित भिंतीचित्रांचे आयोजन




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवलीतील मानपाडा रोडवर MSRDC (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) यांच्या माध्यमातून रस्ता सुरक्षेवर आधारित आकर्षक भिंतीचित्रांची निर्मिती सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक आणि अध्यक्ष विशाल वि. शेटे यांनी विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे या भिंतीचित्रांमध्ये रस्ता सुरक्षा नियमांवर भर दिला जाणार आहे. चालक आणि पादचाऱ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रम ाचा मुख्य उद्देश आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्या सहकार्याने या भिंतीचित्रांचे डिझाईन आणि संकल्पना पुरवण्यात आली असून, या चित्रांची निर्मिती सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू झाली आहे. या उपक्रमामुळे मानपाडा रोड परिसर अधिक आकर्षक तर होईलच, पण नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे


## विविध विकास कामांची आढावा बैठक संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, पनवेल :** महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकास काम ांचा विभागवार आढावा सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकीत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी घेतला. यावेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. या आढावा बैठकीत बांधकाम विभागाच्यावतीने महापालिका हद्दीत सुरू असलेल्या विविध कामांच्या प्रगती बाबत माहिती घेण्यात आली. तसेच नव्याने होऊ घातलेले महापालिका हद्दीतील कामे जसे की सर्व स्म शानभूमी सुधारणा, विविध ठिकाणच्या शाळा बांधणे, दुरूस्ती करणे, हिरकणी रूग्णालय या कामाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. महापालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी शौचालय उभारण्यास्तव जागेची पाहणी करण्या बाबत आरोग्य विभागास सूचना दिल्या. तसेच अग्निशमन विभाग, नगररचना, दिव्यांग, पाणीपुरवठा, विद्युत विभागाच्या विविध कामांचा आढावा घेऊन त्यावर चर्चा करण्यात आली. तसेच महापालिका कार्यक्षेत्रातील होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर लावताना त्यावरती क्यू आर कोड लावणे बंधनकारक आहे. ज्या होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवरती क्यू आर कोड नाहीत असे होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवरती तात्काळ तोडक कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना नोटीस देऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयुक्तांनी यावेळी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक संचालक केशव शिंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखा परीक्षक संदिप खुरपे, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सर्व विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## गटशिक्षणाधिकारी कार्यालयाला घाण नालीच्या पाण्याचा विळखा



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.२४, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील १२५ गावातील शिक्षकांचा डोलारा सांभाळणाऱ्या गट शिक्षण अधिकारी कार्यालयाला तिन्ही बाजूने घाण नालीच्या दुषीत पाण्याचा विळखा घातल्याचे दिसून येत आहे. यामुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांना याचा अतोनात त्रास होत असुन दुषीत पाण्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. या दुषीत पाण्याची दुर्गंध येत आहे. या कार्यालयाला कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना सुध्दा याचा त्रास होत असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे.

## जुईनगर मध्ये कचरा पेट्यांची वाणवा; पालिकेकडे देण्यासाठी पेट्याच नाहीत




**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२४, जुईनगर (नवी मुंबई) :** महापालिकेच्या नेरुळ विभागात कचरापेट्यांची गरज दिवसेंदिवस वाढत चालली आहे. जुईनगर सेक्टर २३ येथील बऱ्याच सोसायट्यांच्या कचरा पेट्या तुटलेल्या आहेत. सोसायटी पदाधिकारी नवीन कचरा पेट्यांची गेले वर्षभर मागणी करत आहेत. पण कोणीही अधिकारी त्याकडे लक्ष देत नाहीत, असे जुईनगरच्या माजी नगर सेविका तनुजा मढवी यांनी अक्षराज वृत्तपत्राच्या बातमीदारांसोबत बोलताना सांगितले.

पुढे त्या म्हणाल्या की, अधिकाऱ्यांना विचारले असता ते सांगतात, सध्या आमच्याकडे कचरा पेट्या आल्या नाहीत. आम्ही तुम्हांला कचरा पेट्या कुठून देणार? नागरिकांची मागणी असली तर अधिकारी असेच दुर्लक्ष करतात पण तेच जर स्वछता अभियान आले की निरनिराळ्या कारणांसाठी पैसा पुरवला जातो. जुईनगर प्रभागात असंख्य ठिकाणी डेब्रिज पडले आहे. पण पालिकेकडे त्यासाठी कोणतीही योजना नाही कि बजेट नाही असे अधिकारी बोलत असतात. अश्या वेळी प्रश्न पडतो की, पालिका फक्त स्वच्छता अभियानाच्या वेळीच खर्च करणार का? जुईनगर मध्ये ठीक ठिकाणी मातीचे ढिगारे पडलेले आहेत. ठिकठिकाणी बंद पडलेल्या गाड्या उभ्या आहेत. गटर व नाले तुंबत असतात. त्यासाठी पैसा नसतो मग आता स्वच्छतेचा खोटा देखावा करण्यासाठी पैसा कसा काय व कुठुन येतो याचे उत्तर कोणी देईल का?

प्रत्येक नगरसेवकाची इच्छा असते कि त्याचा प्रभाग स्वच्छ असावा पण अधिकारी लोक सहकार्य करत नाहीत. असे वाटते कोणताही खर्च करायचा असला कि त्यात काट छाट कशी करायची ते पहात असतात जसे काही त्यांच्या पगारातले पैसे जाणार असतात. पण त्यांच्या वागण्यामुळे ठेकेदार बिचारा पिसला जातो त्यामुळे कामाचा दर्जा सुमारच असतो. घन कचरा विभागाच्या अधिकाऱ्यांनी जुईनगर प्रभाग क्रमांक ८३ कडे लक्ष देऊन प्रभागात स्वछता राखावी. असे जुईनगरच्या माजी नगरसेविका तनुजा मढवी यांनी सांगितले आहे.

## लाडक्या बहिणी व भावामुळे विधानसभेत विजय; आमदार दाते यांचा रेनवडीत सत्कार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** आमच्या लाडक्या बहिणी व भावानी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी म नापासून झटून काम केल्यामुळे पारनेर-नगर विधानसभा निवडणुकीत विजय झाल्याचा गौरवोद्गार आ. काशिनाथ दाते यांनी काढले. माजी उपसरपंच बाबासाहेब येवले यांच्या नेतृत्वाखाली आमदार काशिनाथ दाते, आ.शरद सोनवणे यांचा रेनवडी ग्रामस्थांच्या वतीने पेढे तुला व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप नेते विश्वनाथ कोरडे होते.

नागरी सत्कार व पेढे तुला सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. दाते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रम कळम कर, महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी थोरात, तालुकाध्यक्षा सोनाली सालके, तालुका उपाध्यक्ष अतुल माने, जिल्हा कार्यकारिणी सदस्य किसनराव शिंदे, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, माजी सरपंच भाऊसाहेब डेरे, रखमाजी कापसे, अपर्णाताई खामकर आदींसह मान्यवर उपस्थित होते. सन्मान सोहळ्याप्रसंगी रेनवडी ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या जागृत दक्षिणमुखी हनुमान मंदिरात नवसपूर्तीसाठी पेढे तुला करण्यात आली. रेनवडीचा चेहरा मोहरा बदलणार राज्यात व केंद्रात आपले सरकार आहे. त्यामुळे निधीची कमतरता भासणार नाही. चालू आर्थिक वर्षात नवडी बंधारा रस्ता, जांभळी मळा रस्ता, हनुमान मंदिरासमोरील सभा मंडपाचे काम पूर्ण करून रेनवडीचा चेहरा मोहरा बदलणार असल्याचे आ.काशिनाथ दाते यांनी जाहीर केले. तसेच रेनवडीतून सर्वात जास्त मताधिक्य महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून केलेल्या कामामुळे विधानसभा निवडणुकीत विजय झाला. निघोज जिल्हा परिषदेच्या गटामध्ये सर्वात कमी मतदार संख्या असलेल्या रेनवडी गावातून सर्वात जास्त मताधिक्य मिळाले असल्याचे सांगत आ. दाते यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विश्वनाथ येवले, हनुमंत डेरे, राजेंद्र डेरे, गणेश डेरे, ज्ञानदेव डेरे, शरद येवले, राहूल येवले, राजाराम येवले, बाळासाहेब येवले, भाऊसाहेब येवले, कैलास येवले, संदीप भोर, पवन भोर, संदीप गोसावी, पोपट दाते आदींसह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. राजेंद्र डेरे यांनी सूत्रसंचालन केले व उपसरपंच बाबासाहेब येवले यांनी आभार मानले.



### सरपंच येवले यांनी केली विविध कामांची मागणी

**कुकडी नदीवरील पूल, पिंपरी कावळ हद्दीतील जेजुरी राज्य मार्ग ते बंधाऱ्याचा १ किलो मीटर रस्त्याचे डांबरीकरण, मंगरुळ शिव ते शंकरवाडी, म्हस्केवाडी ५ किलो मीटर रस्ता डांबरीकरण, हनुमान मंदिरासमोर सभा मंडप, गावठाण ते बंधारा रस्ता डांबरीकरण, जांभळी मळा रस्ता डांबरीकरण इतर कामांची मागणी करण्यात आली.**

## ठाणे जनता दरबारात गणेश नाईक यांनी दिव्याच्या रहिवाशांच्या मागणीची घेतली दखल

### बिल्डिंग तोडण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना सदर कारवाई थांबवण्याचे दिले आदेश




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, दिवा (ठाणे) :** ठाणे जनता दरबारातूनच ठाणे जिल्हा संपर्क मंत्री, पालघर जिल्हा पालकमंत्री, गणेश नाईक यांनी अनंत पार्क रहिवाश्यांच्या बिल्डिंग तोडण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना सदर कारवाई थांबवण्याचे दिले आदेश आणि नागरिकांची बाजू मांडण्यासाठी अवधी देण्यात यावा. यासाठी देखील महापालिका, महाराष्ट्र शासन आणि न्यायालयाला करणार आवाहन.

दिवा पूर्व येथील आनंद पार्क सोसायटीतील ३ बिल्डिंगवर रहिवाशांच्या घरावर तोडक कारवाई करण्यासाठी ठाणे महानगरपालिका गेली असता सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी महाजनवाडी येथे पालघरचे पालकमंत्री महाराष्ट्राचे वन मंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे संपर्क मंत्री गणेश नाईक यांची सदर इमारतीतील रहिवाश्यांनी व भारतीय जनता पार्टीच्या दिव्यातील कार्यकर्त्यांनी तातडीने भेट घेतली. त्यांच्याबरोबर कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, ठाण्याचे आमदार संजय केळकर, जिल्हा अध्यक्ष संजय वाघुळे असता नाईक साहेबांनी अधिकाऱ्यांना रहिवाशांची बाजु मांडण्यासाठी काही दिवसाचा अवधी मिळावा. त्या अनुषंगाने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. अधिकाऱ्यांना सदर कारवाई स्थगित करण्याचे आदेश दिले.

विशेष म्हणजे कारवाई करायला जेव्हा पथक आले तेव्हा सर्वच पक्षाचे लोकप्रतिनिधी, सर्व समाजसेवी संस्था, मिडिया, पत्रकार, सर्व दिवेकर ठामपणे या रहिवाश्यांच्या पाठीशी उभे राहिले आणि या सर्वांची एकदम जबाबदारीने दखल भाजपनेही घेतल्यामुळे आज तरी निदान कारवाई मागे घेण्यात आली.

यावेळी रहिवाश्यांनी गणेश नाईक आणि दिव्यातील सर्व भाजप पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. तसेच गणेश नाईक यांनी अनंत पार्क रहिवाश्यांना विश्वास दिला की या तुमच्या लढ्यात आम्ही पूर्णपणे तुमच्या सोबत आहोत. कोणताही अन्याय होऊ देणार नाही, याची आम्ही काळजी घेऊ.

## जिल्हा परिषद मुगाव शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, दौंड (पुणे) :** जिल्हा परिषद मुगाव येथील शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांकडून विविध कलाविष्कार सादर करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, लहान मुलांचे काल्पनिक विश्व, शेतकरी गीत, जागरण गोंधळ, बॉलीवूड, सोशल मीडिया या गाण्यांवर नृत्य व माझी शाळा हे नाटक अशा विविध विषयांवर कलागुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली तर भगतसिंग यांच्या जीवनपटावर माहितीपट विद्यार्थ्यांनी सादर केला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. यावेळी राज्य विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य संभाजी यादव, देऊळगाव राजे केंद्राच्या केंद्रप्रमुख वैशाली जानराव, हिंगणी बेर्डी गावच्या पोलीस पाटील राधिकाताई पाहणे, विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन सुवर्णाताई कामठे व हनुमंत कामठे तसेच सामाजिक कार्यकर्ते भगवान खोमणे व ग्रामपंचायत सदस्य विकास ढवळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रसंत, थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२३, कळंब (धाराशिव) :** कळंब येथील रंगीला चौकात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अनाथ बालकांना ड्रेस चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित भारतीय जनता पक्षाचे नेते सतपालजी बनसोडे यांनी संत गाडगेबाबा यांच्यापासून प्रेरणा घेत स्वच्छतेचा दिलेला संदेश आज समाजात सर्वदूर पोहोचवण्याचे कार्य शासन करत आहे. म्हणजेच संत गाडगेबाबा यांचे विचार किती थोर आहेत. याचा प्रत्यय आपणाला येतो, संत गाडगेबाबा यांनी शिक्षण, समाजाचे विचार ही आपल्या साहीत्य, किर्तनातून स्वच्छ करण्याचा समाजाला संदेश दिला. अशा थोर समाजसुधारकांची जयंती जास्तीतजास्त उत्तमरितीने साजरी करून समाजात संतांचे विचार ज्वलंत ठेवण्याचे कार्य यापुढे ही विद्यार्थी व तरूणाईने पुढे कायम ठेवले पाहिजे असे मत ही सतपालजी बनसोडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी भाजपाचे ओबीसी नेते संतोष (भाऊ) भांडे, सीआर घाडगे, नागोराव शिंदे, अमर चाऊस, रवी शिंदे, महावीर गायकवाड, निवृत्ती हौसलमल, डॉ.विनोद खारमाटे, इंजि.समिर धर्माधिकारी, खंडेराव गायकवाड, बाळासाहेब सोनावणे तसेच विद्यार्थी व महीला बहुसंख्येने उपस्थित होते.

